# INDEX

## Academic Year: -2020-21


| Sr. No | Name of the Author | Name of the Book | Page. No |
|---|---|---|---|
| 1. | Dr. Dhobale G. K. | A Geographical Study of Weekly Market Centers | 1-6 |
| 2 | Dr. Kadam G.G | Krushi Vikas Yojnanchi Ambalbajavani : Ek Drushtishep | 7-8 |
| 3 | Dr. Gawade Rajaram P | Feminism in Literature | 9-15 |


PRINCIPAL
ARTS SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR 413106 DIST- PUNE

**Principal**

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE
INDAPUR DIST PUNE

# A GEOGRAPHICAL STUDY OF WEEKLY MARKET CENTERS



DR. G. K. DHOBALE



CamScanner

# CONTENTS


| | | |
|---|---|---|
| I. | INTRODUCTION | 7 - 14 |
| II. | BACKGROUND OF THE STUDY REGION | 15 - 29 |
| III. | MARPHOLOGY OF WEEKLY MARKETS | 30 - 41 |
| IV. | BEHAVIOUR OF SELLERS | 42 - 64 |
| V. | BEHAVIOUR OF BUYERS | 65 - 84 |
| VI. | MARKET CENTER AND SERVICE AREA | 85 - 96 |
| VII. | SUMMARY AND CONCLUSION | 97 - 101 |
| | REFERENCES | 102 - 116 |




CamScanner



# Dr. G. K. Dhobale


Name - MR. GAJANAN KRISHNA DHOBALE

Date of Birth - 1st June, 1968

Academic Qualification - M. A., M. Ed.

Designation - Associate Professor


- Working as Assistant Professor in Geography in Art, Science And Commerce College, Indapur, Dist. Pune, Since 1994
- Worked as N.S.S. Proramme Officer in Art, Science And Commerce College, Indapur, Dist. Pune, in 2000-2004
- Worked as incharge Principal in Arts College, Bhigwan, Dist. Pune in 2009-2011
- About 10 research papers published in verious national and international research journals.
- About 08 research papers are presented in verious national and international conferences.
- Gave around eight Invited / Guest lectures at various institutes.


Residential Address - Amrutwel, Suryanagari, Baramati, Pune-413133

Contact No. - 7083459707

E-mail - dhobalegajanan10@gmail.com



ROLI BOOK DISTRIBUTORS

KANPUR-208 021

Mo. : 7379494578

₹ 500/-

978-93-84662-52-3


9 789384 662523




CamScanner

# MANAGEMENT OF SURFACE WATER RESOURCES: A CASE STUDY OF INDAPUR TAHSIL DISTRICT PUNE

Dr. Gajanan Dhobale





CamScanner

**Index**

I. Surface Water Resources Scenario/9

II Study Area and Methodology/28

III Availability of Surface Water Resources in the Indapur Tahsil/74

IV Water Utilization and Requirement in the Indapur Tahsil/96

V Water Budget Estimation of the Indapur Tahsil/170

VI Management of Water Resources in the Indapur Tahsil/214

VII Major Findings, Conclusions and Suggestions/256

References/281



CamScanner



Dr. Gajanan Dhobale

## About the Author

Academic Qualification : M.A., M.Ed., M.Phil., Ph.D.

Designation: Assistant Professor

- Head and Assistant Professor, Post Graduate Teaching Center, Department of Geography, Arts, Science and Commerce College, Indapur, Dist. Pune.
- Thirty years teaching experience of UG level and six years Teaching experience of PG level.
- Ph.D. Guide of Savitribai Phule Pune University, Pune.
- One reference book has published.
- 16 Research papers are published in various National and International journals.
- 12 research papers are presented in various national and International conferences.
- 07 lectures are delivered in different seminar, conference and workshop.
- Worked as in charge Principal in Arts College, Bhigwan, Tal. Indapur, Dist. Pune
- Work experience on various committees in the college level such as Environmental Awareness, NSS and different sections coordinator.

Published: शब्दवैभव प्रकाशन

Print ISBN: 978-93-92004-10-0



CamScanner

# कृषि विकास योजनांची अंमलबजावणी

## एक दृष्टीक्षेप

डॉ. गजानन कदम






Scanned with CamScanner



**डॉ. गजानन कदम**

## पुस्तकाविषयी..

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास शेती, उद्योग व सेवा या मुख्य तीन क्षेत्रावर अवलंबून आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ५९ टक्के लोकसंख्या शेती व शेतीशी संलग्न व्यवसाय यावर निर्भर आहे. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारांनी शेतीच्या विकासाला प्राधान्य दिले, परंतु इतर क्षेत्रांच्या तुलनेत शेतीचा विकास झाला नाही. आजही शेतीचे स्वरूप पावसावरील जुगार, उदरनिर्वाहासाठी शेती, उत्पन्नातील अनियमितपणा आणि बेकारी असे आहे.

शेती क्षेत्राची दुरवस्था दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी शेती, शेती पूरक व्यवसाय, वने, सामाजिक न्याय, शिक्षण आणि आरोग्य अशा विविध २५ विभागाच्यावतीने २१० विकास योजना सुरू केल्या.एवढ्या योजना असूनही भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती समाधानकारक नाही. यप्रस्तुत पुस्तकामध्ये कृषिक्षेत्राला केंद्रस्थानी ठेवून ज्या कृषी विकास योजना केंद्र सरकार, महाराष्ट्र राज्य यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी निर्माण केल्या. त्यांच्या अंमलबजावणी संदर्भात विचार मंथन केले आहे. कृषी विकास योजनांच्या अंमलबजावणीतील समस्या जाणून घेऊन कृषी विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शेतकरी व शासनासाठी शिफारशी सुचविल्या आहेत.

Published: शब्दवैभव प्रकाशन

Print ISBN:

Copyright ©



Scanned with CamScanner

ISBN : 978-93-5473-314-7

कृषि विकास योजनांची अंमलबजावणी : एक दृष्टीक्षेप
Krushi Vikas Yojnanchi Amalbajvani : Ek
**Drushtishep**

सर्व हक्क :

**डॉ. गजानन कदम**
एम. ए., एम. फिल., पीएच.डी., सेट
सहाय्यक --प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
इंदापूर, जि. पुणे
भ्रमणध्वनी : ७५८८१५३४६४

**प्रकाशकः ज्योत्स्ना इंगळे-नेरकर**
शब्दवैभव प्रकाशन,
शॉप नं. २१५, महालक्ष्मी मेट्रो स्क्वेअर, जोगेश्वरी लेन ४,
बुधवार पेठ, पुणे - ४११००२
भ्रमणध्वनी : ९६०७२७३२२४/८८५५८९०३०७

**अक्षरजुळणी/मुद्रक :**
मोरेश्वर संतोष नेरकर
शब्दवैभव प्रकाशन, पुणे.
भ्रमणध्वनी : ८८५५८९०३०६/०७


**मुखपृष्ठ : तुषार भिवंडीकर**

**प्रथमावृत्ती : ३१ मार्च २०२१**

**मूल्य** : २२०



Scanned with CamScanner





Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


**मराठी विभाग**

| | | |
|---|---|---|
| * साहित्यातील स्त्रीवाद | डॉ. तुकाराम रोंगटे | ९ |
| * स्त्रीवाद : पाऊलखुणा आणि आजचे वास्तव | डॉ. प्रज्ञा नागेश लामतुरे | २३ |
| * मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | प्रा. डॉ. बागूल. एम.एस. | २८ |
| * स्त्रीवाद : स्वरूप आणि संकल्पना | प्रा.डॉ.म्हस्के सीताराम खंडू | ३३ |
| * स्त्रीवादी साहित्याची पार्श्वभूमी आणि वाटचाल | डॉ. विजय विष्णुपंत केसकर | ४० |
| * स्त्रीवाद स्वरूप आणि संकल्पना | प्रा. दत्तात्रय फटांगडे | ४४ |
| * स्त्रीवाद : स्वरूप आणि संकल्पना | डॉ. संदीप रंगनाथ तापकीर | ४९ |
| * एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारक स्त्रियांच्या चरित्रांचा स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून विचार | जागृती अरुण बधान | ५२ |
| * ''स्त्रीवाद आणि गौरी देशपांडे यांचे साहित्य'' | डॉ. महादेव वाळुंज | ५९ |
| * स्त्रीवादी साहित्य : स्वरूप व संकल्पना | प्रा. डॉ. प्रवीण ताटेदेशमुख | ६६ |
| * ''स्त्रीवाद आणि स्त्रीवादी जाणीवेची कविता'' | डॉ. जी.आर. ढेंबरे | ७८ |
| * अर्थकरण व स्त्रीवाद | प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले | ८७ |
| * प्राचार्य गो.ग.आगरकरांचे स्त्री-सुधारणेविषयक विचार | श्री. सुरेश नामदेव दांडगे | ९१ |
| * स्त्रीवादी कादंबरी | प्रा.डॉ.कल्पना नारायण गावडे | १०१ |
| * मराठी स्त्रीवादी साहित्य | डॉ. राजाराम गावडे | १११ |
| * स्त्रीवादाची मध्ययुगीन पार्श्वभूमी | प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे | ११६ |
| * स्त्रीवाद : ऐतिहासिक पाऊलखुणा | डॉ. प्रताप मारूती गायकवाड | १२२ |
| * विभावरी शिरूरकर यांच्या साहित्यातील स्त्रीवादी दृष्टिकोन | डॉ. गव्हाणे भाऊसाहेब | १३० |
| * श्री समर्थकन्या वेणास्वामी | प्रा.अपर्णा मल्लिनाथ गुरव | १३६ |
| * साठोत्तरी दलित कवयित्रींची कवितेतून येणारे स्त्रीवादी जाणीवीचे चित्रण | प्रा. शहाजी पारस | १४० |
| * अर्थकारण व स्त्रीवाद | डॉ. साळवे धर्मेंद्र भगवान | १४९ |
| * प्राचीन भारतातील भगवान गौतम बुद्धांचे स्त्रीवादी विचार : एक अभ्यास | प्रा.विकास भानुदास टकले | १५२ |
| * मेघना पेठे यांच्या कथेतील स्त्रीवादी जाणिवा | प्रा. तुकाराम भवर | १५७ |
| * मराठी साहित्यातील स्त्रीवादी कथा | प्रा. डॉ. सुनील निगडे | १६३ |
| * स्त्रीवाद व आदिवासी स्त्री | डॉ. मुक्ता राजेंद्र आंभेरे | १६८ |
| * साहित्यातील स्त्रीवाद | डॉ. सीमा नाईक-गोसावी | १७४ |
| * २००० नंतरची स्त्रीवादी कथा | प्रा.डॉ. महादेव कांबळे | १८२ |
| * मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | डॉ. क्षिरसागर जी. एस. | १८९ |




Scanned with CamScanner

# मराठी स्त्रीवादी साहित्य

डॉ. राजाराम गावडे

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी साहित्याचा आढावा घेत असताना स्त्रीलिखित साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यास झालेला नाही हे दिसून येते. 'मराठी साहित्यातील स्त्रीवाद' हा विषय कला महाविद्यालय भिगवण व तेथील मराठी विभाग यांनी परिसंवादासाठी निश्चित केला. यानिमित्ताने स्त्रियांचे विश्व, त्यांच्या सामाजिक स्थितीगतीचे यथार्थ दर्शन घडेल. म्हणून या महाविद्यालयाचे व तेथील मराठी विभागाचेही अभिनंदन.

१८५० पासून स्त्रीवादी साहित्याचा मागोवा घेत असताना महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा सुरू केली. तेथूनच मुलींना शिक्षण मिळायला सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले या पहिल्या स्त्री शिक्षिका होत. तसेच १८२४ साली गंगाबाई नावाच्या बाईनी मुंबईत मुलींसाठी शाळा सुरू केली. पण ती फार काळ आपले अस्तित्व दाखवू शकली नाही. १९१६ पासून महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली. स्त्रियांना उच्च शिक्षण मिळू लागले. स्त्रियांच्या दृष्टीने ही फार महत्त्वाची घटना होती. स्त्रियांना शिक्षण मिळायला सुरुवात झाल्यावर घराबाहेरचे जग त्या मोकळेपणाने व डोळसपणे न्याहाळू लागल्या. त्यांना आत्मभान येऊ लागले. शिक्षणाने त्यांच्यामध्ये होत असलेला हा बदल महत्त्वाचा होता. शिक्षण मिळायला लागल्यावर साहजिकच त्यांच्या अनुभूतीचे क्षितिज विस्तारले. आपले सुखदुःख आपल्या अनुभूती, भोवतालची सुखदुःखे त्या शब्दबद्ध करू लागल्या. गेल्या दीडशे वर्षात स्त्रियांनी जे लेखन केले ते पुरुष लेखकांच्या तुलनेत फारसे नसले, तरी आपले भावविश्व शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न हा निश्चित कौतुकास्पद आहे.

भारतीय परंपरेने 'स्त्री'ला देवतेचे स्वरूप मानलेले असले तरी आज



Scanned with CamScanner

एकविसाव्या शतकातही भारतातील सर्वात दुर्बल आणि दुर्लक्षित घटक कोणता असे विचारले, तर 'स्त्रिया आणि शोषित' असेच उत्तर देता येईल. महात्मा गांधींच्या प्रेरणेने पुरुषांच्या बरोबरीने भारतीय स्त्रिया स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्या. हा अपवाद वगळता स्त्रियांना मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्यात आपण कमी पडलो, हे कबूल केले पाहिजे. वास्तविक महाराष्ट्रात समाज सुधारकांची फार मोठी परंपरा आहे. महात्मा ज्योतिराव फुले, गो.ग.आगरकर, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडे केशव कर्वे, यांनी स्त्रियांना 'माणूस' म्हणून वागविण्यासाठी एक कृतिशील अशी वैचारिक बैठक निर्माण केली. तरीही आपल्या वैचारिक जडणघडणीत फारसा बदल झाला नाही. समाजामध्ये स्त्रियांना कायम दुय्यम स्थान दिले गेले. या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब साहित्याच्या प्रांतात उमटते.

आद्य कवयित्री महदबेपासून सुरू होणारी स्त्रियांच्या लेखनाची परंपरा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, तुकारामांच्या शिष्या बहिणाबाई अशा दिशेने एकोणिसाव्या शतकातील मिसेस फरार, ताराबाई शिंदे आणि सावित्रीबाई फुले यांच्यापर्यंत येऊन पोचत असली, तरीही विसाव्या शतकातील बहिणाबाई चौधरींचा 'देशी' रंग तसा प्रस्थापितांना कळालाच नाही. डॉ.सरोजिनी बाबर यांच्यामुळे लोकसाहित्याच्या प्रांतातील स्त्रीधन उजेडात आले आणि मौखिक साहित्याची ही मौलिक परंपरा समाजापुढे आली. तसेच डॉ. महादेव वाळुंज यांनीही 'लोकसाहित्यातील स्त्रीधन' यातून लोकसाहित्यातील स्त्रीचे चित्र उजेडात आणले आहे. त्याचप्रमाणे स्वतःच्या आईबद्दल नारायण सुर्वे यांनी 'माझी आई', डॉ.उत्तम कांबळे यांनी 'आई समजून घेताना', डॉ. शैलेश त्रिभुवन 'आई तू होतीस तेव्हा', डॉ. महादेव वाळुंज यांनी 'माझ्या हिरकणीची वाट', या लेखकांनीही कविता, तसेच आत्मकथनाच्या माध्यमातून समाजासमोर आपल्या जनमदात्रीचा संघर्ष समर्थपणे रेखाटला आहे. 'स्मृतिचित्रे'-लक्ष्मीबाई टिळक, 'माझे पुराण' आनंदी बाई कर्वे, 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' रमाबाई रानडे, विभावरी शिरुरकर, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, इ. स्त्री लेखकांनी स्त्रियांचे विश्व, आपल्या वाटयाला आलेले प्रसंग रेखाटलेले आहेत.

**विभावरी शिरुरकर उर्फ मालतीबाई बेडेकर यांचे मराठी साहित्यातील योगदान :**

विभावरी शिरुरकर उर्फ मालतीबाई बेडेकर यांनी 'हिंदोळ्यावर', 'विरलेले



Scanned with CamScanner

स्वप्न', 'बळी', 'चांगुणा', 'जाई', 'शबरी', 'उमा', 'खरे मास्तर', इ. कादंबऱ्या लिहिल्या. खंबीर पण विचारी स्त्री म्हणून, एक माणूस म्हणूनचा विचार 'हिंदोळ्यावर' व 'विरलेले स्वप्न' मध्ये केला आहे. तर 'बळी' या कादंबरीमध्ये गुन्हेगारी जगाच्या वेदना व्यक्त केल्या आहेत. स्त्रीवादी साहित्याच्या खुणा विभावरी शिरुरकरांच्या कादंबऱ्यातून उमटल्या आहेत. त्यांच्या 'हिंदोळ्यावर' या कादंबरीतील अचला ही शाळेत शिक्षिका आहे. तिचा पती व्यसनी व गुन्हेगार असतो. तो पुढे अचलेला टाकून देतो. त्यामुळे तिच्या मनाचा, शरीराचा कोंडमारा होतो. ती मोहवश किंवा दुबळी नाही. प्रेम करण्याचा व आई होण्याचा आपल्याला अधिकार आहे असे तिला ठामपणे वाटते. हिंदूधर्म तिला घटस्फोटाची किंवा व्दितीय विवाहाची परवानगी देत नाही. म्हणून ती विचारपूर्वक विरागशी जवळीक साधते. मात्र बाळाच्या आगमनाची चाहूल लागल्यावर ती अस्वस्थ होते. विरागच्या प्रेमाची, आधाराची तिला गरज वाटते. तरीही ती भोवतालच्या समाजामुळे भयभीत होते. अशा अचलेला समाजासमोर आणले म्हणून समाजाने त्याकाळी या अज्ञात लेखिकेवर अनेक आरोप केले. पण समाजाची पर्वा न करता स्वत:च्या बुद्धीला व भावनेला पटेल, तोच विचार करणाऱ्या व्यक्तिरेखा विभावरी शिरुरकरांच्या कादंबऱ्यातून दिसतात.

'विरलेले स्वप्न' या कादंबरीत शिकलेल्या मुलांची तत्कालीन परिस्थिती, मन:स्थिती लेखिकेने जाणली आहे. परदेशाची ओढ असणाऱ्या तरुणांनी एकदा आत्मपरीक्षण करुन पहावे अशी अपेक्षा लेखिका व्यक्त करते.

'बळी' या कादंबरीत पांढरपेशा समाजाने बाजूला सारलेला गावकुसाबाहेरील समाज आहे. दलित जीवनाचे भेदक चित्रण या कादंबरीत आले आहे. आबाचे दु:ख शिकणाऱ्या प्रत्येक दलिताने पचविले आहे. याच कादंबरीत अपत्यसंगोपनाच्या जाणिवेने वेडी होऊन स्वैराचार करणारी आई भेटते. पोटच्या मुलांना दोन वेळेला जेवण मिळावे म्हणून गोऱ्या सोजिरांची शेज सजविणारी आबाची आई विभावरी शिरुरकरांनी रेखाटली आहे.

'चांगुणा' या कादंबरीत एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला कसे समजून घेतले याचा वस्तुपाठ येथे पहायला मिळतो. चांगुणा घाबरत घाबरत मुलाजवळ आली आणि मुलाच्या 'आई' या नुसत्या हाकेने ती कंगाल माय ओलावली आणि तिच्या डोळ्यांना पाणी आले.

'जाई' या कादंबरीत स्त्रियांच्या जाणिवा-नेणिवेच्या विश्वातली एक


Scanned with CamScanner

मध्यवर्ती घटना असते. ते तिच्या आशा-आकांक्षांचे, सुख-दुःखाचे, मोहाचे आणि भोगाचेही निवासस्थान असते. या कदांबरीत स्त्री मनाचे सगळे अनुभवविश्व या घराच्या सांदी कोपऱ्यात कसे लगडलेले असते याचा उत्तम प्रत्यय दिला आहे.

'शबरी'या कादंबरीत स्त्रियांना आत्मसन्मानाने जगावयाचे असेल तर त्यांनी शिकले पाहिजे, स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. आर्थिक स्वावलंबन ही स्त्रीमुक्तीची एक महत्त्वाची दिशा मानली जाते. शिरुरकरांनीही या प्रश्नाचा विचार केला आहे. 'शबरी' या कादंबरीतील त्यांची नायिका उच्चविद्याविभूषित आहे. नोकरी करून स्वावलंबनाचा मार्ग तिने अवलंबिलेला आहे. परंतु असे असूनही शबरीच्या वाट्याला आत्मसन्मानाचे जिणे आले का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच आहे. पुरुषसत्ताक समाजरचनेचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जोपर्यत बदलत नाही तोपर्यंत शिक्षणाने व आर्थिक स्वावलंबनाने स्त्रियांना आत्मसन्मान प्राप्त होण्याची खात्री नाही. शिकलेल्या मुलींना त्यांना साजेसा पती मिळणे ही गोष्ट त्या बाबतीत एक प्रमुख समस्या होती. कारण शिकलेल्या मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप नव्हता. परंतु शिकलेल्या मुलांनाही आपल्या बायकोने घराबाहेर जाऊन स्वतंत्रपणे नोकरी करावी व स्वावलंबी जीवन जगावे असे वाटत नव्हते. सुशिक्षित तरुणही पारंपरिक नजरेने स्त्रियांकडे बघत असत. या कादंबरीतील अभिराम म्हणूनच शबरीने नोकरी सोडावी या अटीवर लग्नाला तयार होतो. पुरुषी स्वाभिमानापुढे स्त्रीला मान तुकवावी लागते.

'उमा' या कादंबरीत उमा या नायिकेचे विधुराशी लग्न होते तो जगन्नाथ हा दांभिक पुरुष आहे. कुठलाही वैचारिक कणा नसलेला, परिस्थितीशी विचाराने सामना करण्याचे बळ नसलेला भित्रा माणूस आहे. आईवडिलांच्या मनाविरुद्ध लग्न केले पण त्या आईवडिलांकडून स्वतःच्या बायकोचा होणारा मानसिक छळ तो थांबवू शकला नाही. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर एका विधवा स्त्रीशी रममाण होणारा जगन्नाथ त्या विधवेची इच्छा असूनही तिच्याशी लग्न लावायला तयार होत नाही. त्याला तिची सोबत हवी असते. पत्नी म्हणून तो तिला स्वीकारायला तयार नसतो. जगन्नाथ आणि उमा यांच्यातील मानसिक संघर्ष आणि वैचारिक मतभेद हा या कादंबरीचा मध्यवर्ती विषय आहे.

सनातनी सामाजिक मूल्ये आणि आधुनिक वैचारिक जाणिवा यांच्यातील परस्पर संघर्ष अनेक छोट्या-मोठ्या प्रसंगांतून लेखिकेने या कादंबरीत मांडलेला आहे. स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य यांचा अतिशय प्रगल्भ विचार १९२० पासून


Scanned with CamScanner

लेखिकांनी केलेला दिसतो. स्त्रीच्या सहनशीलतेचा अंत झाल्यावर मात्र अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा खंबीरपणाही लेखिकांनी दाखविला आहे. अन्यायकारक धार्मिक रूढी, धर्मातर, जातिभेद यांचा निषेध, स्वातंत्र्य चळवळींची नोंद या कादंबऱ्यात येते. शिरुरकरांनी स्त्रीचा माणूस म्हणून विचार करण्याची दृष्टी दिली. शिरुरकरांच्या सर्वच कादंबऱ्यांमध्ये स्त्रीत्वाच्या सन्मानाचे केंद्रवर्ती स्थान आहे. शिक्षणाने जीवनसन्मानित होईल का? पारंपरिक विवाह संस्कारांऐवजी श्रममूल्यांच्या विभागणीवर आधरलेल्या जाणिवांनी सहजीवनाचा करार केल्याने स्त्रीचे संसारिक जीवन सुखी होईल का? अशा अनेक प्रश्नांचा विचार त्यांनी केला. अखेर स्त्रीत्वाचा सन्मान मातृत्वात आहे. हे एक सत्य त्यांनी हेरले. ते तिच्यापुरते सांत्वन मूल्य आहे. समग्र जीवनातील तिच्या दुय्यमत्वाची प्रतिमा पुसून टाकायची असेल तर पुरुषांनी बदलले पाहिजे. त्यांच्यात सहिष्णुता जागविण्याचे काम शिरुरकरांनी आपल्या लेखणीने समर्थपणे केले.

**संदर्भग्रंथ**


१. स्त्रीवादी साहित्याचा मागोवा, खंड १,२,३ डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरुणा ढेरे, विनया खडपेकर.

२. विभावरी शिरुरकर यांचे वाङ्मय स्त्रीवादी आकलन उषाताई रावसाहेब शिंदे

३. भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य इ.स.१८५० ते २०००, भाग १, २. डॉ. मंदा खांडगे, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. विद्या देवधर, डॉ. निशिकांत मिरजकर.

४. मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, वसंत आबाजी डहाके


❑❑❑


**डॉ. राजाराम गावडे**

कला विज्ञान आणि वाणिज्य

महाविद्यालय, इंदापूर




Scanned with CamScanner